प्रकरण - ३

संसार म्हणजे काय ?

संसारी जीव हा चार गतीत भटकतो. त्या गती अशा- १. मनुष्यगती २.तिर्यंच गती ३.देवगती ४. नरकगती. या चारही गती जीवाला गतीनामकर्माच्या उदयाने प्राप्त होतात.[१]

मनुष्यगती :

माणूस त्याला म्हणतात जो हेय-उपादेश, तत्व-अतत्व, धर्म-अधर्म यांचा निर्णय करु शकतो. अल्प-आरंभ व अल्प-परिग्रह या गोष्टी सामान्यत: मनुष्य जन्मास कारणीभूत होतात. या मनुष्यगतीतूनच मोक्ष प्राप्ती होते. देव, नारकी किंवा पशू यांच्या योनीतून मोक्ष साधना करता येते नाही. ज्ञानादी गुणांचा परमोच्च विकास याच गतीत शक्य आहे. माणसाचे सामान्य पर्याप्त, योनिमत् आणि अपर्याप्त असे चार भेद केलेले आहेत. मानवाच्या आयुर्मर्यादांचे जैन शास्त्रात वैज्ञानिकदृष्टया विवेचन केले आहे. मन,वचन, व शरीर यांच्या उच्चतम शक्तीचेही वर्णन आहे. मन, वचन व शरीर हे जड पदार्थ असले तरी आत्माच्या दिव्य सामार्थ्यामुळे ते सजीव वाटतात व अनेक प्रचंड सामर्थ्याची चुणूक ते दर्शवितात.

देवगती :

पुण्यमय कार्यानी जीवाला देवगती प्राप्त होते. देवांचे भवनवासी, व्यंतरवासी, ज्योतिष्क, व वैमानिक असे चार प्रकार आहेत. भवनवासीचे असुर, नाग, विद्युत, सुपर्ण, अग्नी, वात, स्तनित, उदधि, दीप व दिककुमार असे प्रकार आहेत. व्यंतर देवांचे किन्नर, किंपुरुष, महाउरग, गंधर्व, यक्ष, राक्षस, भूत व विशाच्च असे भेद आहेत. ज्योतिष्क देवांचे चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्र व तारे असे प्रकार आहेत. ज्योतिष्क देव हे त्या त्या ग्रहांचे, ता-यांचे, स्वामी असतात. सर्वात जास्त संख्या ज्योतिष्क देवांची सांगितली आहे. त्यांनंतर ९ ग्रैवेयक विमानवासी देव; त्यानंतर विजय, वैजयंत, जयंत, अपराजित व सर्वार्थ-सिध्दि अशा पाच विमानांत राहणारे देव आहेत.

स्वर्गात जन्मणारे देव आई-वडिलांच्या संबंधाशिवाय स्वयमेव 'उत्पाद' शय्येवर जन्मतात. ती शय्या फुलांची बनविलेली असते. देवांची शरीरे अस्थि, मज्जा, इ. धातूंनी रहित असतात.

त्यांचे आयुष्य, ज्ञान, सुखप्राप्ती, उपभोग-सामर्थ्य, मान-अधिकार इ. बाबत तरतमभाव असतो. या देवांना जन्मत:च मति, श्रुति व अवधि ही तीन ज्ञाने असतात. त्यांना आपल्या शरीरांचे आकार विक्रिया नावांच्या शक्तीने वाटेल तेस बदलता येतात. ऐशान स्वर्गापर्यंतचे देव प्रत्यक्ष इंद्रिये व शरीर याव्दारे सुख मिळवितात. इतर देव स्पर्श, रुप-दर्शन, शब्द-श्रवण आणि मन यांच्याव्दारे सुखप्राप्ती करुन घेतात. मरणापूर्वी देवांच्या गळ्यांतील पुष्पमाळा कोमेजू लागतात. त्यावरुन आयुष्य संपण्याचा काळ जवळ आला, हे त्यांना जाणवते. देवांना अपघाती मरण नसते. ते पुर्ण आयुष्याचा उपभोग घेतात. देवदिकांच्या आयुमर्यादा, ज्ञानशक्ति, संयम इ. बाबतीत सविस्तर वर्णन जैन ग्रंथातून आढळतात.

[१]नरकगती :

तत्वार्थसूत्रात जीव नरकात कां जाते, हे सांगताना असे म्हटले आहे की, "फार मोठा परिग्रह आणि अनेक यातायाती उद्योग व संग्रंहाचा हव्यास हे नरकाला कारणीभूत असते."

नरक हे अधोलोकांत असून त्यांची-संख्या सात आहे. तीव्र क्रोधादि विकार, हिंसात्मक प्रवृत्ती यामुळेही नरकगतीस जावे लागते. नारकी जीव स्वत: दु:खी असतात. व इतरांसाठीही दु:ख निर्माण करतात. नरकांतील जीव परस्परांना नित्य ठार करतात. पण त्यांचे शरीर पुन: जुळून येते. आयुष्याचा पूर्ण उपभोग घेतल्याशिवाय त्यांचा नरकगतीशी संबंध तुटत नाही. नारकी जीवांचा जन्म आई-वडिलांच्या संबंधाशिवाय होतो. नारकी जीवानां देखील अवधिज्ञान असते.

तिर्यंचसगती :

कपट-प्रवृती, फसवाफसवी, मनांत एक, वचनांत एक व क्रियेत भलतेच, अशा प्रकारच्या विचारांनी पशु-योनीत जन्म होतो, असे शास्त्रांत सांगितले आहे. या गतीत खूपच त्रास, दु:ख व पीडा आहे. पशूंना कोणकोणत्या यातनेतून जावे लागते हे मानवाला सांगायला नकोच. पशु योनीला वाणी नसल्यामुळे ते आपली इच्छा प्रकट करुं शकत नाहीत. त्यांचे क्रोधादि विकार खूपच तीव्र असतात. त्यांना पीडा देणा-यासंसबंधी सूडाची भावना त्यांच्यात असते.

या चारही गतीत भ्रमण करीत जीव स्वत:च बांधलेल्या कर्मांचीफळे भोगतो. कर्मांची फळे भोगतांना तो सुख-दु:खाचा अनुभव घेतो.

परंतु जेव्हा त्याला आत्मज्ञान होते, आत्म्याचे स्पष्ट स्वरुप कळ्ते, तेव्हा तो पुण्यपापापासून निवृत्त होऊन साधक होतो. काही ग्रंथात अशा परमात्म गतीला सिध्द-गती म्हटले आहे.

निगोद-जीव:

असे अनंतानंत जीव या लोकात विद्यमान आहेत की जे जीव एकाच शरीरात राहातात. एकाच्या मरणाने ते मरतात. एकाच्या जन्माने जन्मतात. श्वासोच्छवास व आहार देखील सर्वांचा सामान्यच असतो. अशा जीवांना साधारण जीव देखील म्हणतात. मरण आणि जन्म यादृष्टीने ते समान असतात. या निगोदाचे नित्य-निगोद व इतर निगोद असे दोन भेद आहेत. जीवाच्या ज्ञान शक्तीची अत्यंत न्यूनतम अवस्था या निगोदी जीवांत असते. जे कधीही त्रस योनीत जाणार नाहीत त्यांना नित्य-निगोदी जीव म्हणतात. इतर निगोदी जीवांनी केव्हातरी व्दि-इंद्रियादिक त्रसपणा प्राप्त करुन घेतलेला असतो.

जीव आणि लेश्या :

जैन शास्त्रातून, जीवयाचे जे क्रोध, मान, मद, मत्सर, लोभादिक परिणाम होतात त्याला अनुसरुन, एक रंग-तत्व सांगितले आहे. हे रंग तत्व भवत: आणि द्रव्यत: असे विभागून सांगितले आहे. हे रंग वस्तुत: पौद्गलिक वस्तु आहे. तो गुण असला तरी त्यामुळे वस्तुंचा परिचय घडतो. परंतु द्रव्य हे भावाला (Potency) अनुसरुन असतात. क्रोधादिक कषायांचे तीव्र, तीव्रतर, तीव्रतम, मंद, मंदतर, मंदतम असे जेव्हा प्रकार पडतात. तेव्हा एक प्रकारचा रंग तेथे दिसून येतो. विकार पौद्गलिक असल्यामुळे व वर्ण हा पुद्गलाचा अविभागी गुण असल्यामुळें रंगाच्या सूक्ष्मतेचा अभ्यासही जैन-तत्व   ज्ञानी मंडळीनी केलेला दिसून यतो. या रंग-तत्वाला लेश्या म्हणतात.

या लेश्या सहा आहेत (१) कृष्ण (२) नील (३) कापोत (कबुतराच्या रंगाचा) (४) पीत (५) पद्म (६) शुक्ल. पूरण काश्यप नांवाच्या भारतीय तत्वज्ञानी माणसाने जीवाचे ६ प्रकार सया सहा लेश्यावरुन केलेले आहेत. इतकेच नव्हे तर माणसाच्या मनाची, वचनाची, व शरीराची उच्च-नीचता रंग तत्वाच्या आधारे केलेली आहे. महाभारताच्या शांती -पर्वात देखील सहा रंग सांगितले आहेत.

षड्जीव वर्णा : परमं प्रमाणं
कृष्णो धूम्रोनीलमदास्य मध्यम्
रक्तं पुनः सहयतरं सुखं तु
हरिद्रवर्ण सुसुखं च शुक्लम् ।   म. भा. शांतीपर्व २८०.३३

ज्यावेळी तमोगुण प्रखर असेल, सत्वगुण न्यून असेल व रजोगुण सम असेल तेव्हा जीवाचा रंग काळा असतो. जेव्हा तमो गुण प्रखर असेल, रजोगुण न्यून असेल व सत्वगुण सम असेल तर तो धूम्रवर्णाचा जीव असतो. अशा रीतीने सत्व, रज व तम या गुणांचा प्रखर, न्यून, व सम या दृष्टीने विभागणी करुन रंग-तत्वाची मांडणी केली आहे.

योग-सूत्रात (७.४) देखील असे म्हटले आहे की, "कर्माशुक्लाकृष्णं योगिनस्त्रि विधमितरेषाम्" योग्यांचे कर्म आणि इतरांचे मन हे काळे, काळे-पांढरे यांनी रहित, पांढरे असे असते. "पातंजली" (इ.स. पूर्व २ रे शतक) आपल्या योगसूत्रांतून सांख्याने सांगितलेले तीन रंग स्वीकारले आहेत.

लेश्यासंबधी जैन कल्पना :

जैन आगमांतून लेश्यांचे अत्यंत विस्तृत असे वर्णन आहे. आचार्य श्री नेमिचंद्र म्हणतात- "लेश्या म्हणजे पुण्य-पापांनी जी आत्म्याला लिंपते ती लेश्या. क्रोधादिक विकारांनी अनुरक्त अशी मन-वचन-शरीररुप प्रतृत्ती म्हणजे लेश्या. वर्ण-नाम-कर्मामुळे शरीराच्या कातडीला जो रंग प्राप्त होतो त्याला द्रव्य-लेश्या म्हणतात. परंतु शरीराच्या वेगवेगळ्या भागाला वेगवेगळा रंग असतो. जसे-दात पांढरे, जीभ-तांबडी, केस काळे.त्यादृष्टीने अनेक प्रकारच्या लेश्या, एकाच जीवांत आढळतात. म्हणून मुख्यतः जरी सहा प्रकार सांगितलेले असले तरी लेश्यांचे परमाणूंच्या दृष्टीने अनंत भेद आहेत. नारकी जीवांची कृष्ण लेश्या असते. मनुष्य,तिर्यंच जीव यांना सहाही लेश्या असतात. सूक्ष्म जीवांचा कपोत-वर्ण असतो. पहिल्या तीन लेश्या पापकारक असून पीत, पद्म शुक्ल या पुण्यकारक आहेत.'

लेश्यांचा सुंदर दृष्टान्त [१]

आगमाचार्यांनी एक रुपक कथा याबाबतीत सांगितली आहे. एकदा हे सहा लेश्यांचे धारक सहा पुरुष वनांत गेले. तेथे त्यांना आंब्याचे झाड दिसले. ते पाहून कृष्ण लेश्याचा धारक म्हणाला "मी हे झाड मुळापासून उपटून फळे खाईन." नील लेश्या धारक म्हणाला,' या वृक्षाचा बुंधा तोडून मी सर्व फळे खाईन." कपोत लेश्या धारक म्हणाला,"मी मोठ्या फांद्या तोडून फळे खाईन." पीत लेश्यावाला म्हणाला,"मी वृक्षाची फळे तोडून खाईन" आणि शुक्ल लेश्यावाला म्हणाला, "मी स्वयमेव खाली पडलेली फळे वेचून खाईन.."

या रुपकामुळे प्रत्येक लेश्यांच्या विकार-विवेकाचे दर्शन घडते. लेश्यांचे विवेचन यासाठी महत्वाचे मानले आहे की, पुढील जन्मासंबधीचा बंध (पुढच्या जन्मात कोणत्या गतीत, कोणत्या जातीत जन्म होणार आहे ते) लेश्यामुळे होतो. आयुकर्म सोडून इतर सात कर्मांचा बंध नेहमीच होत असतो. परंतु आयुकर्मांचा बंध आयुष्याचा २/३ भाग संपल्यानंतर होण्याची शक्यता असते. तेव्हाही नाही झाला तर समृत्युपूर्वी होतो. कदाचित् आपल्याकडे उतरायुष्यांत संन्यास धर्म सांगितला आहे. त्याचेही कारण हेच असावे. मृत्युसमयी देखील सल्लेखना सांगितली आहे. याचे कारण पर-भव हा चांगला मिळावा, हे आहे.

सामाजिक जीवन अधिक सुखकर, आनंददायक आणि प्रेमपूर्ण व्हायचे असेल तर समाजाचा आचारधर्म शुक्ल लेश्याकडे वळला पाहिजे. वृक्ष तोडून फळे खाण्याचा विचार हा सामाजिक जीवन विषाक्त करील. जै्न धर्माला अधिक उन्नत असे मानवी जीवन अपेक्षित आहे. म्हणूनच लेश्येचा विचार विस्तृतपणे केलेला आढळून येतो.

आत्मा व मुक्तीमार्ग

आत्म्याचे संसारी व मुक्त हे भेद आपण पाहिले. आत्म्याच्या शुध्द स्वरुपाचे ज्ञान इ ाले्ल्यांच्या स्वानुभवानेच मुक्तीची प्रेरणा सदैव होत राहिली आहे. आत्म्याच्या या संसारी अवस्थेतही आत्म्याचे काही प्रदेश नित्य शुध्द राहिलेले आहेत. आणि ही आंशिक परमशुध्दताच सर्वांशात्मक शुध्दतेसाठी कार्यप्रवण होते. आत्म्याच्या ठायी असलेली चेतनाच परमशुध्दतेकडे धाव घेत असते. ती चेतना उर्ध्वगामी करण्याचा हेतूच जीवनाचा आहे. अनंत जन्म घेऊनही

आम्ही निर्णय करु शकलो नाही की मार्ग कोणता आहे ? जायचे कोठे आहे ! केव्हा जायचे आहे ?

आम्ही निर्णयाला टाळत आलो आहोत. आम्ही 'आज' निर्णय करायला घाबरत आहोत. आत्मोध्दाराची संधी आम्ही वाया घालवित आलो आहोत. म्हणून आमचे जीवन सुख-दु:ख, इष्ट-अनिष्ट यांच्यामध्ये झोकांडया खात आहे. जागृतीचे क्षण येवूनही आम्ही प्रमादी बनून राहिलो. इतक्यावेळा संसारिक सुख-दु:खे भोगली तरीही आमची तृष्णा संपत नाही. आम्ही प्रिय काय आहे ते शोधत आहोत. आम्ही 'श्रेय' काय आहे ते शोधीत नाही. 'प्रिय' मार्ग हा अशाश्वतेकडे नेतो. आम्ही श्रेय मार्ग स्वीकारत नाही. त्यामुळे आम्ही माया-विश्वात मशगुल राहतो. डोळे बंद करुन दुध पिणा-या मांजराप्रमाणे आम्ही सत्यामार्गाकडे न पाहता जीवनाचा आस्वाद घेत आहोत. श्रेय मार्गाच्या शोधात सुरुवातीला दु:ख होईल. कारण त्याने प्रिय-मार्ग खंडीत होतो. आशांची स्वप्ने विरुन जातात. परतंत्रमार्ग बंद होऊन स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त होतो. इंद्रियांची मूळची प्रवृत्ती सुखाकडे असते. श्रेयमार्गात इंद्रियांना स्थान नाही. तेथे जागृत आत्म्यालाच महत्व आहे. ही जागृती म्हणजेच सम्यक्त्व. जीवनाकडे सम्यक् रीतीने पाहणे म्हणजेच सम्यक्त्व. सम्यक्त्व म्हणजे आत्माच्या लक्षाचे भान. कुठे जायचे याचा निर्णय म्हणजे सम्यक्त्व्.

जीवनाकडे पाहणारे तीन प्रकारचे लोक आहेत. इंद्रिय-सुख म्हणजेच जीवन, शरीर म्हणजेच आत्मा म्हणणारा एक वर्ग आहे. याला 'बहिरात्मा' (अ-जागृत, सुप्त) म्हणतात. हे लोक फार गाढ झोपलेले आहेत.

इंद्रियांच्या स्वाधीन झाल्यामुळे त्यांची चेतना निद्रिस्त झालेली आहे.दुसरा प्रकार आहे-अंतरात्म्याचा. जो जागृत झाला आहे, ज्याची स्वप्ने संपलेली आहेत तो अंतरात्मा. अंतरात्म्याची जागृती पुन: बहिरात्म्याच्या निद्रेत प्रवेश करु शकते. त्या अंतरात्म्याचे आत्मदर्शन कच्चे् असते. म्हणून अंतरात्म्यात प्रवेश करताना दृढतेने प्रवेश करायला हवा. जो मार्ग निवडला त्या मार्गात दृढतेने स्थिर राहण्याची खंबहीरता आचार-विचारात राखली पाहिजे. ही दृढता,ही अकाट्य श्रध्दा म्हणजेच मार्गासंबंधी नि:शंकता. शंका काढायला मन फार उत्सुक असते. सत्यमार्गापासून दूर घेऊन जाण्यासाठी मन अनेक युक्त्या योजते, अनेक कुतर्क निर्माण करते. श्रध्देला भ्रष्ट करण्याचे शेकडो मार्ग मनाजवळ असतात. आणि श्रेय मार्गापासून च्युत करायला त्या मनाची

खंबीर तयारी असते. कारण मोक्षमार्गाला इंद्रियाच्या विषयात रस नाही, आणि इंद्रियांना मोक्षमार्गात रस नाही.

म्हणून भगवान् महावीरांचा श्रेयोमार्ग हा बहिरात्म्यापासून अंतरात्मा व तेथून परमात्म्याकडे वाटचाल करतो. ही वाटचाल म्हणजेच साधकाचा मार्ग आहे. या मार्गाचे निरुपण सात तत्वे या नांवानी केले आहे. पण खरे तत्व आात्मा-तत्वच आहे. त्या आत्मोपलब्धीसाठीच भगवंताचा सारा उपदेश आहे. या आात्मोपलब्धीसाठी खरे धार्मिक होणे अगत्याचे आहे. धार्मिक व्यक्तीच स्व-धर्माला प्राप्त करुन घेऊ शकते. दार्शनिक केवळ विवेचन करुन सांगेल. पण आचार मार्गाचा अवलंब केवळ धार्मिक व्यक्तीच करु शकते. 'उद्या धर्माचरण करीन' असे म्हणणे म्हणजे 'आज घराला आग लागली असता' 'उद्या आग विझवीन' असे म्हटल्यासारखे आहे.साधकाला तीव्रतेने आत्मध्यास लागल्याशिवाय आणि श्रेयमार्गाची उत्कटता पटल्याशिवाय माक्षमार्गस्थ होता येत नाही.